# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक १९/०७/२०२४ (शुक्रवार)

---

### नागपूर ग्रामीण हद्दीमधील सट्टापट्टी लिहणाऱ्या आरोपींविरूद्ध कारवाई

दिनांक १८/०७/२०२४ रोजी पोस्टे केळवद येथील स्टाफ पोस्टे केळवद परीसरात पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरद्वारे विश्वसनीय खबर मिळाली की, मौजा मंगसा फाटा येथे नमुद **आरोपी नामे— अशोक भाऊराव गायधने, वय ५१ वर्ष, रा. वार्ड नं. २ मंगसा ता. सावनेर** हा सार्वजनिक ठिकाणी मुंबईवरुन खुलणा—या कल्याण, खजाना या सट्टापट्टीचे बोगस आकड्यावर लोकांकडुन पैसे व नंबरच्या चिट्टया स्विकारुन हारजितचा जुगाराचा खेळ खेळीत असताना मिळुन आल्याने त्याचे ताब्यातून नगदी ५४४०/—रु., निळया शाईचा बॉलपेन व कल्याण असे लिहीलेला चिट्टी असा एकुण ५४४०/—रु. चा मुद्देमाल मिळून आल्याने जप्त करून आरोपीविरूध्द पोलीस ठाणे केळवद कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

दिनांक १८/०७/२०२४ रोजी पोस्टे जलालखेडा येथील स्टाफ पोस्टे जलालखेडा परीसरात पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरद्वारे विश्वसनीय खबर मिळाली की, लोहारी सावंगा येथे **आरोपी नामे— सुनिल पंढरी सोनोने वय ३९ वर्ष रा. लोहारी सांवगा ता. नरखेड** हा लोकांकडुन पैसे घेवुन त्यांना कागदी चिट्ठयावर सट्टापट्टी, वरळी मटका जुगाराचे आकडे लिहुन जुगाराचा खेळ खेळवत आहे. अशा खबरेवरून रेड कारवाई करून आरोपीचे ताब्यातून नगदी ६५०/—रू. सट्टापट्टीचे कागद त्यावर आकडे लिहलेले असा मुद्देमाल मिळून आल्याने जप्त करून आरोपीविरूध्द पोलीस ठाणे जलालखेडा येथे कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोस्टे अरोली येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता गुप्त माहिती मिळाली की, निमखेडा गावात देवशाईन बिअर बारच्या मागे **आरोपी गौतम मुकुंदा ठवरे, वय ४२ वर्ष रा. निमखेडा ता. मौदा** नावाचा इसम हा लोकांकडुन पैसे घेवुन त्यांचे कागदावर आकडे लिहुन सट्टापट्टी जुगाराचा पैश्याचा हारजीतचा खेळ खेळत आहे. अशी माहिती मिळाल्यावरून रेड कारवाई करून आरोपीचे ताब्यातून अंगझडती घेतली असता १) पांढरा रंगाचा कार्बनवर मटक्याचे सट्टापट्टी आकडे मराठीत लिहीलेली २) गुलाबी रंगाचा शाईचा पेन किं. ०५/— रू. ३) नगदी ६००/— रू. असा एकुण ६०५/— रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने जप्त करून आरोपीविरूध्द पोलीस ठाणे अरोली येथे कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

### अवैध दारूची तस्करी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध धडक मोहीम

दिनांक १८/०७/२०२४ रोजी पोस्टे नरखेड येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता यातील **आरोपी नामे— बिरबल जंगल्या सोनबरसे, वय ६५ वर्ष, रा. अंबाडा (देशमुख)** हा मौजा अंबाडा देशमुख शिवार येथे मोहाफुल गावठी दारू बाळगुन विक्री करताना मिळुन आल्याने त्याचे ताब्यातून १५ लिटर मोहाफुल गावठी दारु प्रती ५० रुपये लिटर प्रमाणे एकुण कि. ७५० रु. चा. मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध कलम ६५ ई मदाका प्रमाणे कारवाई करण्यात आली.

पोस्टे मौदा येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता गोपनीय माहिती मिळाली की, चिरव्हा येथे **आरोपी गणेश नामदेव बांते, वय ६३ वर्ष, चिरव्हा ता. मौदा** हा अवैद्यरीत्या दारू विक्री करीत आहे. अशा माहितीवरून

स्टाफसह जावुन त्याचे दुकानाची झडती घेतली असता आरोपीचे ताब्यातून ०९ निपा देशी दारूच्या प्रत्येकी १८० मिली एकूण १६२० मिली प्रती किमती ८० रू प्रमाणे असा एकूण ७२०/—रू चा मुद्देमाल मिळूण आला.

दिनांक १८/०७/२०२४ रोजी पोस्टे खापरखेडा येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता यातील **आरोपी नामे— दिलीप किशोर गणवीर, वय ५० वर्ष रा. न्यु नांदा झोपडपटटी ता. कामठी** याचे दारूबाबत घराची घरझडती घेतली असता त्याचे ताब्यातून नायलॉन थैलीत ११ निपा देशी प्रत्येकी १८० एम एल प्रत्येकी ७०/— रुपये प्रमाणे अशा एकुण ७७०/—रू. चा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध कलम ६५ ई मदाका प्रमाणे कारवाई करण्यात आली.

दिनांक १८/०७/२०२४ रोजी पोस्टे पारशिवनी येथील स्टाफ पोस्टे परीसरात पेट्रोलींग करीत असता मुखबिरद्वारे माहिती मिळाली की, मौजा करंभाड गावात **आरोपी प्रशांत राजकुमार लोहकरे, वय ३१ वर्ष, रा. करंभाड त. पारशिवनी** हा आपले घरी देशी दारूची विक्री करीत आहे. अशा माहिती वरून दारूबाबत घराची घरझडती घेतली असता आरोपीचे ताब्यातून २४ निपा देशी दारू भिंगरी संत्रा नं. १ च्या प्रत्येकी १८० एम एल प्रमाणे एकुण ४३२० एम एल प्रत्येकी ७० रू प्रमाणे एकुण किंमती १६८० रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने जप्त करून आरोपीविरूद्ध कलम ६५ ई मदाका प्रमाणे कारवाई करण्यात आली.

पोस्टे कोंढाळी येथील स्टाफ पेट्रोलींग करीत असता गोपनीय माहिती मिळाली की, **आरोपी मनोज दशरथ शुक्ला, वय ४२ वर्ष, रा. पांजराकाटे ता हिंगणा जि. नागपुर** हा मौजा पांजराकाटे शिवारात आरोपीचे शुक्ला धाबा येथे अवैधरीत्या दारू विक्री करीत आहे. अशा मिळालेल्या गोपनीय माहिती वरून स्टाफचे मदतीने धाब्याची झडती घेतली असता काउंटरचे खाली देशी दारूने भरलेल्या ९० एम एल एकुण १८ निपा ३५ रू प्रमाणे ६३०/— रू चा मुद्देमाल मिळुन आला. आरोपीविरूद्ध कलम ६५ ई मदाका प्रमाणे कारवाई करण्यात आली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर